केंद्र आणि राज्याच्या धोरणांमुळे सहकार क्षेत्राला नवे बळ >> पान 2

ई-स्पोर्ट्स वर्ल्ड कप २०२६ च्या माध्यमातून महाराष्ट्र डिजिटल क्रिएटिव्ह अर्थव्यवस्थेचे नेतृत्व करेल : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस >> पान 3

मयतांच्या नावावर रेशनची लूट? मेहकर प्रशासन झोपेत >> पान 4

दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 05 ■ अंक 02 ■ रविवार, दि. 05 जुलै 2026 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

सुविचार

बदला घेण्यापेक्षा स्वतःला बदलणे जास्त फायद्याचे आहे.



आमिर खान-गौरी स्प्रॅटचा खासगी विवाह सोहळा

आतील पान

# ६ जुलैपर्यंत अतिमुसळधार पावसाचा इशारा; नागरिकांनी सतर्क राहावे : मुख्यमंत्री

## प्रशासन सज्ज; एनडीआरएफ तैनात, दर तीन तासांनी अलर्ट संदेश

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी** : राज्यात पुढील दोन दिवस अतिमुसळधार पाऊस, वादळी वारे आणि काही ठिकाणी अतिवृष्टीची शक्यता असल्याने नागरिकांनी अत्यंत सतर्क राहावे, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. ६ जुलैपर्यंत हवामान विभागाने गंभीर इशारा दिला असून प्रशासनाने आवश्यक ती सर्व तयारी पूर्ण केल्याची माहिती त्यांनी दिली.

मुख्यमंत्री म्हणाले की, धोक्याच्या भागातील नागरिकांना दर तीन तासांनी एसएमएसद्वारे सतर्कतेचे संदेश पाठविले जात आहेत. अनेक जिल्ह्यांमध्ये शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली असून नागरिकांनी शक्यतो अनावश्यक प्रवास टाळावा. प्रशासनाकडून देण्यात येणाऱ्या सर्व सूचना आणि अलर्टचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

राज्य आपत्ती व्यवस्थापन कक्ष, एनडीआरएफ आणि इतर संबंधित यंत्रणा २४ तास परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत. ज्या ठिकाणी अडचणी निर्माण होत आहेत, त्या ठिकाणी तातडीने मदत व बचावकार्य सुरू असून कोणतीही आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी यंत्रणा सज्ज असल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, नव्याने सुरू झालेल्या उड्डाणपुलावरील खड्ड्यांबाबत सोशल मीडियावर सुरू असलेल्या चर्चेवरही मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली. कोणतेही मोठे पायाभूत काम पूर्ण झाल्यानंतर पहिल्या पावसात काही तांत्रिक त्रुटी समोर येऊ शकतात. त्या लक्षात घेऊन आवश्यक दुरुस्ती आणि सुधारणा करण्यात येतात. एमएसआरडीसीला याबाबत सूचना देण्यात आल्या असून, ज्या ठिकाणी कमतरता असतील त्या तातडीने दूर





केल्या जातील, असे त्यांनी स्पष्ट केले.

देशातील सर्वात उंच पूल, सर्वात रुंद बोगदे आणि अनेक महत्त्वाकांक्षी पायाभूत प्रकल्प महाराष्ट्रात साकारले जात आहेत. या कामांमागील अभियंते आणि कर्मचाऱ्यांच्या योगदानाचेही कौतुक झाले पाहिजे. टीका स्वागतार्ह असली तरी ती वस्तुस्थिती लक्षात घेऊनच व्हावी, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

### सहकाऱ्याने प्रायव्हेट पार्टमध्ये कॉम्प्रेसरचा पाइप घातला अन् पोटात हवा भरली; पुण्यात कामगाराचा मृत्यू

**पुणे । प्रतिनिधी** : पुणे जिल्ह्यातील सणसवाडी औद्योगिक क्षेत्रातून एक अत्यंत धक्कादायक आणि खळबळजनक घटना समोर आली आहे. एका कंपनीत रात्रीची शिफ्ट सुरू असताना, सहकाऱ्याने केलेल्या अत्यंत संतापजनक कृत्यामुळे एका ४२ वर्षीय कामगाराला आपला जीव गमवावा लागला आहे. कॉम्प्रेसरचा उच्च दाबाचा पाईप पीडित कामगाराच्या गुदद्वारात घालण्यात आल्याने त्यांच्या पोटात मोठ्या प्रमाणावर हवा भरली आणि उपचारादरम्यान त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या प्रकरणी शिक्रापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेप्रकरणी संतोषकुमार किशोर यादव (वय ३२) यांनी पोलिसांत अधिकृत फिर्याद दिली आहे.

### भात, ज्वारी, बाजरीसह खरीपातील १४ पिकांना विमा संरक्षण

**मुंबई । प्रतिनिधी** : बदलत्या हवामानामुळे शेतीपुढील जोखीम दिवसेंदिवस वाढत चालली असून नैसर्गिक आपत्ती, अवकाळी पाऊस किंवा दुष्काळ अशा प्रतिकूल परिस्थितीमुळे होणाऱ्या नुकसानीपासून बळीराजाला आर्थिक संरक्षण देण्यासाठी राज्य शासनाने सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना लागू केली आहे. यात भात, ज्वारी, बाजरीसह खरीपातील १४ पिकांना विमा संरक्षण देण्यात आले आहे. राज्यातील पात्र शेतकऱ्यांनी हवामान विभागाचा पावसाचा अंदाज लक्षात घेता आपली आर्थिक जोखीम कमी करण्यासाठी या योजनेत मोठ्या प्रमाणावर सहभागी व्हावे आणि ३१ जुलैपूर्वी आपली नोंदणी निश्चित करावी, असे आवाहन राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी केले आहे.

## पंढरपुरात मंचर ग्रामस्थ वारकरी सेवा मंडळाच्या भक्तनिवासाचे उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते लोकार्पण

दैनिक आपला विदर्भ


**पंढरपूर । प्रतिनिधी** : पंढरपूर येथे मंचर ग्रामस्थ वारकरी सेवा मंडळाच्यावतीने उभारण्यात आलेल्या धर्मशाळा-भक्तनिवासाच्या नूतन वास्तूचे उद्घाटन व लोकार्पण उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते झाले.यावेळी माजी गृहमंत्री तथा आमदार दिलीपराव वळसे पाटील, आमदार समाधान आवताडे, आमदार राजू खरे, माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, ह.भ.प. गहिनीनाथ महाराज औसेकर, ह.भ.प. कानोबा महाराज मोरे, यांच्यासह मान्यवर यावेळी उपस्थित होते.

''संपूर्ण महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या चरणी नतमस्तक होते. आजचा दिवस मंचर आणि आंबेगाव तालुक्यातील हजारो ग्रामस्थ-भाविकांसाठी आनंदाचा व भाग्याचा आहे. आषाढी एकादशीच्या निमित्ताने विठ्ठल-रुक्मिणीच्या चरणी सेवा करण्याची संधी मिळाली हे भाग्यच असे सुनेत्रा पवार म्हणाल्या.''''जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे आपुले, तोचि साधू ओळखावा'' या तुकाराम महाराजांच्या अभंगाचा दाखला देत सुनेत्रा पवार यांनी ''ऊन-पावसाची पर्वा न करता पंढरीला येणाऱ्या वारकऱ्यांची सेवा हीच खरी ईश्वरसेवा आहे. दिलीपराव वळसे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामस्थ व वारकरी मंडळांनी ही वास्तू उभारली हे कौतुकास्पद आहे असेही म्हणाल्या.''

मंचरची ऐतिहासिक परंपरा व वास्तूची उपयुक्तता

''मंचरला पांडवकालीन बारव, तपेश्वर भूमीची आध्यात्मिक पार्श्वभूमी आहे. संत तुकाराम महाराजांनी 'मंचरी' हा हस्तलिखित ग्रंथ मंचर येथे लिहिला, त्यात ५३७ अभंग आहेत. ही मंचरकरांसाठी अभिमानाची बाब आहे,'' असेही सुनेत्रा पवार यांनी नमूद केले.''वारीमध्ये येणाऱ्या प्रत्येक वारकऱ्याला हक्काचा निवारा मिळावा यासाठी ही सुसज्ज धर्मशाळा उपयोगी ठरेल. ही इमारत भक्ती व सेवेचे केंद्र बनेल. मंडळाचे संस्थापक ह.भ.प. मारुती धोंडेबा मोर्डे ऊर्फ अण्णा गुरुजींनी पाहिलेले स्वप्न आज पूर्ण झाले आहे. 'पूर्ण केला मनोरथ' या उक्तीप्रमाणे आंबेगाव-मंचरच्या ग्रामस्थांचे पंढरपुरात हक्काचे घर झाले आहे,'' असेही सुनेत्रा पवार यांनी सांगितले.

## चित्रपट आणि ओटीटी पायरसीप्रकरणी टेलिग्रामला केंद्र सरकारची नोटीस; १५ दिवसांत मागवला कारवाईचा अहवाल



दैनिक आपला विदर्भ

नवी दिल्ली: टेलिग्राम प्लॅटफॉर्मवर चित्रपट आणि ओटीटी वरील वेब सीरिज अनधिकृतपणे लीक केल्या जात असल्याच्या तक्रारींनंतर, केंद्र सरकारने टेलिग्रामला नोटीस बजावली आहे. माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने टेलिग्रामला बेकायदेशीर चॅनेल्स आणि ग्रुप्सवर त्वरित कठोर कारवाई करण्याचे आणि केलेल्या कारवाईचा सविस्तर अहवाल १५ दिवसांच्या आत सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

चित्रपटगृहात किंवा ओटीटी प्लॅटफॉर्मवर कोणताही नवा चित्रपट किंवा वेब सीरिज रिलीज झाल्यानंतर अवघ्या काही तासांतच त्याच्या अनधिकृतपणे लिंक्स टेलिग्रामवर उपलब्ध होतात. यामुळे मनोरंजन क्षेत्राचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान होत असून, चित्रपट निर्माते, वितरक आणि डिजिटल प्लॅटफॉर्म्सनी याविरोधात आक्रमक भूमिका घेतली होती. भारताच्या या 'क्रिएटर इकॉनॉमी'चे रक्षण करण्यासाठी आणि चित्रपट सृष्टीतील भागधारकांचे हित जपण्यासाठी सरकारने हे कडक पाऊल उचलले आहे. टेलिग्रामने पायरसी रोखण्यासाठी आपल्या यंत्रणेत तातडीने सुधारणा करावी, असे निर्देश या नोटीसमध्ये देण्यात आले आहेत.

माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने टेलिग्रामला कळवले आहे की, कॉपीराइटचे उल्लंघन हा केवळ दिवाणी स्वरूपाचा गुन्हा नसून, 'कॉपीराइट कायदा, १९५७' आणि 'सिनेमॅटोग्राफ कायदा, १९५२' अंतर्गत तो एक फौजदारी गुन्हाही आहे. यापूर्वी, गेल्या महिन्यात २१ जून रोजी झालेल्या नीट पुनर्परीक्षेच्या पार्श्र्वभूमीवर, केंद्र सरकारने १६ ते २२ जून दरम्यान टेलिग्रामवर तात्पुरती बंदी घातली होती.

अधिकाऱ्यांनी सांगितले की, मंत्रालयाने हे स्पष्ट केले आहे की, पायरसी करणारे प्रत्येक चॅनेल सरकारने एकेक करून ओळखेपर्यंत टेलिग्राम केवळ वाट पाहू शकत नाही. 'आयटी क्ट, २०००' आणि 'आयटी नियम, २०२१' अंतर्गत आवश्यक असलेल्या 'योग्य खबरदारी'च्या निकषांचे पालन केल्याचे सिद्ध करण्यासाठी, केवळ चॅनेल्स एकेक करून काढून टाकण्यासारखी प्रतिक्रियावादी भूमिका पुरेशी ठरणार नाही.

### 'युझरनेम' फीचरबाबतही मागवले स्पष्टीकरण

दरम्यान, केवळ पायरसीच नव्हे तर ऑनलाईन सुरक्षेच्या कारणावरूनही टेलिग्राम सरकारच्या रडारवर आले आहे. केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने दोन दिवसांपूर्वीच टेलिग्राम आणि 'सिग्नल' या दोन्ही प्सना एक नोटीस पाठवली आहे. या नोटीसमध्ये त्यांच्या 'युझरनेम' या फीचरबाबत आणि सायबर गुन्हेगारांकडून होणाऱ्या त्याच्या गैरवापराबाबत स्पष्टीकरण मागवण्यात आले आहे.

## मेहकरजवळ समृद्धी महामार्गावर पुलाखाली कंटेनर अडकला; काही काळ वाहतूक विस्कळीत





दैनिक आपला विदर्भ

**मेहकर । प्रतिनिधी** : मेहकर जिल्ह्यातील मेहकरजवळ समृद्धी महामार्गावर उंची अधिक असलेला एक कंटेनर पुलाखाली अडकल्याने काही काळ वाहतुकीवर परिणाम झाला. या घटनेमुळे महामार्गावर वाहनांच्या रांगा लागल्या असून काही काळ वाहतूक विस्कळीत झाली.

मिळालेल्या माहितीनुसार, कंटेनरची उंची पुलाच्या क्लिअरन्सपेक्षा जास्त असल्याने तो पुलाखाली अडकला. कंटेनर बाहेर काढण्यासाठी त्याच्या टायरमधील हवा सोडण्याचे काम वृत्त लिहिपर्यंत सुरू होते.

घटनेची माहिती मिळताच फरतापूर महामार्ग पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी वाहतुकीचे नियोजन करून इतर वाहनांची सुरक्षितपणे वाहतूक सुरू ठेवण्याचा प्रयत्न केला.

दरम्यान, या प्रकारामुळे काही काळ वाहनचालकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला. समृद्धी महामार्गावर अशा प्रकारच्या घटना अधूनमधून घडत असल्याने वाहनचालकांकडून योग्य नियोजन, उंचीची स्पष्ट सूचना आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याची मागणी होत आहे. मात्र, प्रशासनाकडून या समस्येकडे पुरेसे लक्ष दिले जात नसल्याची भावना काही वाहनचालकांनी व्यक्त केली.

# केंद्राच्या उत्तम व्यवस्थापनामुळे देश सर्वात मोठ्या ऊर्जा संकटातून बाहेर!

दैनिक आपला विदर्भ

जयपूर; वृत्तसंस्था : पश्र्चिम आशियातील युद्धामुळे घरगुती गॅस सिलिंडरचे दर दोन हजार रुपयांपर्यंत जाऊ शकले असते. तथापि, सरकारने यावर उत्तम व्यवस्थापन करून देशाला २१ व्या शतकातील सर्वात मोठ्या ऊर्जा संकटातून बाहेर काढले. म्हणूनच सिलिंडर सुमारे ९५० रुपयांना मिळत आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे.

पंतप्रधान मोदी राजस्थानच्या दौऱ्यावर असून, पचपदरा येथे त्यांनी देशातील सर्वात आधुनिक रिफायनरीचे उद्घाटन केले. तसेच, जयपूर मेट्रोच्या फेज-२ ची पायाभरणीही केली. मोदी म्हणाले,

### अन्यथा सिलिंडरचे दर दोन हजारांपर्यंत गेले असते

पश्र्चिम आशियामध्ये झालेल्या युद्धामुळे संपूर्ण जगासमोर एकवीसाव्या शतकातील सर्वात मोठे ऊर्जा संकट निर्माण झाले होते. तथापि, काळाची पावले ओळखून सरकारने सुयोग्य नियोजन केले. या काळात भारताच्या दृढ शक्तीमुळे सर्वात मोठे संकटही छोटे बनल्याचे दिसून आले. भारताने या काळात आपल्या संसाधनांचा अधिक चांगल्या पद्धतीने वापर केला. त्यामुळे इंधनाच्या किमती आटोक्यात राहिल्या, असे त्यांनी नमूद केले. तत्पूर्वी, पंतप्रधान मोदी यांनी जोधपूर येथील विमानतळाच्या नवीन टर्मिनल इमारतीचे उद्घाटन केले.

आत्मनिर्भरतेच्या दिशेने भक्कम पाऊल

राजस्थानच्या या भूमीतून भारताने विकसित होण्याच्या, आत्मनिर्भर होण्याच्या दिशेने खूप मोठे पाऊल उचलले आहे. भाजपची सरकारे प्रकल्पांची केवळ पायाभरणी करून सोडून देत नाहीत. आम्ही ते पूर्ण करण्यासाठी दिवस-रात्र एक करतो. दोन महिन्यांपूर्वी रिफायनरीमध्ये जो अपघात झाला, त्यानंतर इतक्या वेगाने काम पूर्ण करणे, हे कठोर परिश्रमाचे फळ आहे. आव्हान कितीही मोठे असले तरी नवा भारत आपल्या संकल्पांपासून ना मागे हटतो, ना वेग कमी करतो.



पचपदरा (राजस्थान) : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी येथे देशातील अत्याधुनिक रिफायनरीचे उद्घाटन केल्यानंतर तेथील तंत्रज्ञांशी संवाद साधला.





पक्षाच्या धोरणाला विरोध म्हणून यांनी आपला पक्ष सोडून नवीन पक्ष स्थापन केला. आता समविचारी पक्ष म्हणून आपल्याबरोबर युती व्हावी. अशी त्यांची इच्छा आहे!

## सर्वात बेभरवशाचं राष्ट्र

आजमितीला जगातलं सर्वात बेभरवशाचं राष्ट्र कुठलं, तर बहुधा उत्तर मिळेल पाकिस्तान किंवा बांगलादेश. परंतु अमेरिकेच्या इतिहासाचा विशेषतः अलीकडील अभ्यास केला, तर अमेरिकाही बेभरवशाचं आढळून येईल. अमेरिकेच्या निर्मितीपासूनच म्हणजे मागच्या २५० वर्षांपासून सांगायचं एक आणि करायचं दुसरंच म्हणजे अगदी विरुद्ध अशी तेथील राजकारणी, महत्त्वाच्या व्यक्ती आणि अगदी सर्वोच्च पदावरच्या व्यक्तींची वर्तणूक होती असं दिसून येईल. आपण असं म्हणू शकतो की जगाच्या पाठीवरच्या कुठल्याही राजकारण्याची प्रवृत्ती तीच असते. ते खरं असलं तरी चुकीची गोष्ट करून त्याचं समर्थन करण्याच्या बाबतीत अमेरिकेचा हात कुणी धरू शकेल असं वाटत नाही. मुळात जगातील सर्वात जुनी लोकशाही हे बिरुद मिरवणारी अमेरिका बरोबर या बिरुदाच्या मूल्याविरुद्ध वागत आलेली आहे. आज ४ जुलैला अमेरिकेच्या स्वातंत्र्याला २५० वर्षं पूर्ण होतायत. त्या निमित्तानं जगातल्या या सर्वात जुन्या लोकशाहीनं आपल्या वर्तणुकीचं सिंहावलोकन करणं आवश्यक आहे. अमेरिकेच्या स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्यात 'सर्व मानव समान असून त्यांना समान अधिकार आहेत' असं लिखित स्वरूपात नमूद केलेलं असूनही पुढे गुलामगिरीचं समर्थन करण्यात आलं एवढंच नव्हे तर गुलाम हे 'मालमत्ता' आहेत अशी पळवाट काढण्यात आली. गुलामगिरी या समस्येवर तिथे यादवी युद्ध होऊन संघराज्य फुटण्याची वेळ आली. पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धातील अमेरिकेच्या सहभागाची कारणं समजू शकतो परंतु जपानच्या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून महाविनाशक अण्वस्त्रांचा वापर कितपत समर्थनीय होता याला समाधानकारक उत्तर मिळत नाही. यानंतरच अमेरिकेच्या 'मनी अँड मसल पॉवर'चा वापर सुरू झालेला दिसतो. लोकशाही मूल्यं जपण्याचा बडेजाव मिरवणाऱ्या य राष्ट्रानं 'राष्ट्रीय हिता'चं कारण पुढे करून डझनावारी हुकूमशहांना समर्थन देऊन मदत केली. हा दुटप्पीपणा इतका वाढत गेला की केवळ रशियाचं (तत्कालीन सोव्हिएत युनियन) महत्त्व कमी करण्यासाठी अमेरिकेनं वारंवार पाकिस्तानच्या लष्करशहांना पाठिंबा देऊन भरघोस मदत केली. याच्या बदल्यात काय मिळवलं ? तर ओसामा बिन लादेनला लपून राहायला मदत करणाऱ्या आणि एका अर्थानं पाठीत खंजीर खुपसून विश्र्वासघात करणाऱ्या राष्ट्राला कायमचं अभय दिलं, पूर्वी केलेली ऐतिहासिक सूडाची भाषा विसरून ! जगात सर्वात बलशाली म्हणून मिरवणाऱ्या या बलाढ्य राष्ट्रानं द्वितीय जागतिक महायुद्धानंतर कारण नसताना किंवा अगदी दुबळं कारण पुढे करून जवळजवळ प्रत्येक युद्धात भाग घेतला आणि एखाद-दुसरा अपवाद सोडला तर सपाटून मार खाल्ला. याचं ठळक उदाहरण म्हणजे व्हिएतनाम युद्ध. सुमारे वीस वर्षं चाललेल्या या युद्धामध्ये व्हिएतनाम या चिमुकल्या देशानं अमेरिकेला दाती तृण धरायला भाग पाडलं. तब्बल अठ्ठावन्न हजारांपेक्षा जास्त अमेरिकी सैनिक मृत्यूमुखी तर पडलेच आणखी दीड लाखांवर जायबंदी झाले. पदरात काय पडलं तर दारुण पराभव. शिवाय आर्थिक नुकसानाला तर मोजदादच नाही. एका अनुमानानुसार एक ट्रिलियन म्हणजे एक लाख कोटी डॉलर्सपेक्षाही जास्त नुकसान झालं. एवढं सगळं होऊनही या अपयशाला कुणीही जबाबदार नाही की साधी चौकशीही नाही. अमेरिकेनं तत्त्वांपासून उघडपणे धडधडीत फारकत घेतल्याचं एक मुख्य उदाहरण म्हणजे तत्कालीन पूर्व पाकिस्तानात नृशंस वंशसंहार चालू असताना त्याकडे कानाडोळा करून पाकिस्तानी लष्करशहाला केलेली मदत. अर्थात तिथेही या खेळीनं तोंडघशी पाडलं आणि बांगलादेश स्वतंत्र झाला. या दरम्यान तत्कालीन भारतीय पंतप्रधान इंदिरा गांधींबाबत अतिशय खालच्या दर्जाची भाषा अमेरिकी राष्ट्रपती निक्सन यांनी वापरली आणि अमेरिकी उच्चपदस्थांची नैतिक पातळी अधोरेखित झाली. अगदी अलीकडचं उदाहरण द्यायचं झालं तर इराणवर दादागिरी करत अमेरिकेनं त्यांच्यावर बॉंबवर्षाव केला पण अनपेक्षित घडलं. अमेरिका इराणला जितकं दुबळं समजत होती तितका तो देश दुबळा निघाला नाही. त्यांनी जबरदस्त प्रतिकार केला आणि आता अमेरिकेला तहाची भीक मागण्याची अवस्था आली आहे. ट्रंपसाहेबांनी तर आपण बेभरवशाचे आहोत हे सिद्ध करायचा जणू विडाच उचलला आहे. अध्यक्षपदाच्या पहिल्या कालावधीत त्यांनी पाकिस्तानची 'यांना आपण खूप काही दिलं आणि बदल्यात यांनी फक्त फसवणूक आणि खोटारडेपणा दिला' अशी संभावना केली होती. आता तोच पाकिस्तान त्यांना फार उपयुक्त वाटू लागला आहे. पाकिस्तानच्या मदतीनं त्यांनी आभासी चलनात प्रचंड वैयक्तिक नफा कमावला आहे. गमतीची गोष्ट अशी की आभासी चलनाला त्यांनी आपल्या पहिल्या कारकिर्दीदरम्यान 'आभासी चलन हे खोटं चलन की जो खरा पैसा नाहीच', असं संबोधलं होतं. फ्रेंच मुत्सद्दी टेलीराँ म्हणाले होते की राजकारणी जेव्हा होय म्हणतो तेव्हा त्याचा अर्थ कदाचित् असा असतो, तो जेव्हा कदाचित् म्हणतो तेव्हा त्याचा अर्थ नाही असा असतो आणि जर तो नाही म्हणाला तर तो राजकारणीच नव्हे! म्हणून राजकारणी म्हटलं की तो बेभरवशाचा असणार हे गृहीत धरलंच जावं. पण त्यामध्ये इतकी सुसंगतता २५० वर्षं म्हणजे जरा जास्तीच नाही का ?

# केंद्र आणि राज्याच्या धोरणांमुळे सहकार क्षेत्राला नवे बळ

## शेतकऱ्यापर्यंत कर्ज व विकास पोहोचविण्यात सहकारी संस्थांची भूमिका निर्णायक : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### सहकार गौरव पुरस्कार सोहळा – विद्याधर अनास्कर यांना 'सहकार महर्षी', आमदार विनय कोरे यांना सहकार भूषण पुरस्कार









दैनिक आपला विदर्भ

**मुंबई | प्रतिनिधी :** महाराष्ट्राने सहकार चळवळीचे मर्म शंभर वर्षांपूर्वीच समजून घेत शेतकऱ्यांना आर्थिक बळ दिले. आजही सहकार हेच ग्रामीण विकासाचे सर्वात प्रभावी साधन ठरत आहे. केंद्र आणि राज्य सरकारच्या धोरणांमुळे सहकार क्षेत्राला नवे बळ मिळत असून, शेवटच्या शेतकऱ्यापर्यंत कर्ज व विकास पोहोचविण्यात सहकारी संस्थांची भूमिका निर्णायक ठरत असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

आंतरराष्ट्रीय सहकार दिनानिमित्त महाराष्ट्र राज्य सहकारी संघ आणि सहकारी महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने यशवंतराव चव्हाण सेंटरमध्ये आयोजित सहकार गौरव पुरस्कार सोहळ्यात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.

सहकार क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या विविध व्यक्ती, संस्था आणि पदाधिकाऱ्यांचा या सोहळ्यात गौरव करण्यात आला. यावेळी विधानसभा अध्यक्ष ॲड राहुल नार्वेकर, उद्योग मंत्री डॉ उदय सामंत, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, सहकार व पुनर्वसन राज्यमंत्री डॉ पंकज भोयर, महाराष्ट्र राज्य सहकारी संघाचे अध्यक्ष आमदार प्रवीण दरेकर, आमदार रवींद्र चव्हाण, वारणा सहकार समूहाचे अध्यक्ष आमदार विनय कोरे, आमदार चित्रा वाघ, आमदार अभिजित पाटील, आमदार संजय भेंडे, राज्य सहकारी संघाचे संचालक शिवाजीराव नलावडे, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे प्रशासकीय अध्यक्ष, विद्याधर अनास्कर, प्रकाश दरेकर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

**महाराष्ट्राने सहकार चळवळीचे मर्म पूर्वीच ओळखले**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, महाराष्ट्राने सहकार चळवळीचे मर्म खूप पूर्वी ओळखले होते. सव्वाशे वर्षांपूर्वीपासून सहकाराच्या माध्यमातून शेतकऱ्यांना सावकारांच्या जाचातून मुक्त करण्याचा प्रयत्न सुरू झाला. त्यानंतरच्या काळात सहकारी पतपेढी, बँकिंग, कृषी, डेअरी, गृहनिर्माण, मार्केटिंग अशा विविध क्षेत्रांत सहकारी संस्थांची उभारणी झाली. पहिली सहकारी पतपेढी १९०४ मध्ये उभी राहिली, तर १९११ मध्ये शिखर बँकेची स्थापना झाली. धनंजयराव गाडगीळ, विठ्ठलराव विखे-पाटील, वैकुंठभाई मेहता यांसारख्या अग्रणी व्यक्तींनी सहकाराला दिलेल्या दिशा-निर्देशांचे स्मरण यावेळी मुख्यमंत्र्यांनी केले.

**आता सहकाराला राष्ट्रीय स्तरावर धोरणात्मक महत्त्व**

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, आज महाराष्ट्रात दोन लाखांहून अधिक सहकारी संस्था कार्यरत असून सहकाराचे सर्वाधिक व्यापक जाळे हे याच राज्यात आहे.सहकार क्षेत्राची खरी ताकद ओळखून ६ जुलै २०२१ रोजी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशात पहिल्यांदाच स्वतंत्र सहकार मंत्रालय स्थापन केले, याचा विशेष उल्लेख करत मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले, पूर्वी सहकाराला फक्त काही राज्यांपुरती मर्यादित चळवळ म्हणून पाहिले जात होते; मात्र आता सहकाराला राष्ट्रीय स्तरावर धोरणात्मक महत्त्व प्राप्त झाले आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची पहिल्या केंद्रीय सहकार मंत्रिपदासाठी निवड झाल्याने सहकार क्षेत्राला दूरदृष्टी आणि अनुभव लाभला आहे, असे ते म्हणाले.

राष्ट्रीय सहकार धोरण जाहीर करून पुढील २० वर्षांत देशाच्या जीडीपीमध्ये सहकार क्षेत्राचा हिस्सा तीन पट वाढवण्याचे लक्ष्य केंद्र सरकारने ठेवले आहे. ६३ हजार प्राथमिक कृषी पतसंस्थांचे डिजिटायझेशन, पाच वर्षांत दोन लाख नवीन 'पॅक्स' उभारण्याचा निर्णय, नॅशनल को-ऑपरेटिव्ह एक्सपोर्ट्स लिमिटेड, नॅशनल को-ऑपरेटिव्ह ऑर्गॅनिक्स लिमिटेड, भारतीय बीज सहकारी समिती लिमिटेड, अम्ब्रेला ऑर्गनायझेशन आणि केंद्रीय सहकारिता विद्यापीठ अशा विविध उपक्रमांमुळे सहकार क्षेत्राला नवे बळ मिळत असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

सहकारी साखर कारखान्यांचा १० हजार कोटी रुपयांचा आयकर माफ करण्याचा निर्णय, इथेनॉल आणि सीबीजी धोरणांमुळे साखर उद्योगाला मिळालेले संजीवनी याचा उल्लेख मुख्यमंत्र्यांनी यावेळी केला. सहकारी संस्थांना ग्रामीण भागात १७ प्रकारची कामे खुली करून एनसीडीसीमार्फत अर्थसाहाय्याची सोय केल्याने सहकार संस्था या ग्रामीण परिवर्तनाचे प्रभावी साधन ठरत आहेत, असे त्यांनी नमूद केले.

**सहकारी बँकांची कामगिरी कॉर्पोरेट बँकांपेक्षाही चांगली**

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, २१व्या शतकात सहकार जिवंत राहील का, कॉर्पोरेट क्षेत्राशी स्पर्धा करू शकेल का, असा प्रश्न अनेकांना पडला होता; परंतु प्रत्यक्षात सहकारी बँकांनी कॉर्पोरेट बँकांपेक्षाही चांगले काम करून दाखवले आहे. सहकारी संस्थांच्या वित्तीय प्रवेशामुळे विकास वेगाने घडत असून, महाराष्ट्रात शेवटच्या शेतकऱ्याला कर्ज पोहोचविण्याचे काम जिल्हा सहकारी बँका करीत आहेत, असेही त्यांनी सांगितले.

**मुंबईतील मराठी माणसाचे घराचे स्वप्न स्वयं पुनर्विकासामुळे पूर्ण**

महाराष्ट्रातील सहकारी संस्थांपैकी ४० ते ४५ टक्के संस्था या सहकारी गृहनिर्माण संस्था असून हा घटक दीर्घकाळ उपेक्षित राहिला होता. मात्र आमदार प्रवीण दरेकर यांच्या पाठपुराव्यामुळे सहकार कायद्यात गृहनिर्माण संस्थांसाठी स्वतंत्र अध्याय तयार करण्यात आला आहे. या आधारावर स्वयं पुनर्विकास योजना तयार करून सहकारी सोसायट्यांना स्वतःच्या पुनर्विकासाचे अधिकार देण्यात आल्याने अनेक कुटुंबांचे मोठ्या घराचे स्वप्न पूर्ण होत असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री श्री फडणवीस म्हणाले, मुंबईतील मराठी माणसाचे घराचे स्वप्न स्वयं पुनर्विकासामुळे पूर्ण होत असून ४०० चौरस फुटांवरून १००० चौरस फुटांमध्ये राहायला जाणारे सभासद पाहून होणारा आनंद अवर्णनीय आहे. विद्यमान प्रकल्पांना अर्थसाहाय्य वाढविण्यासाठी सहकारी बँकांनी हजारो पेंडिंग प्रकल्पांना मदत करावी, असे आवाहन यावेळी त्यांनी केले. युडीसीपीआरमधील अडचणी दूर करून मुंबईबाहेरील सहकारी गृहनिर्माण संस्थांनाही स्वयं पुनर्विकास प्रक्रियेत सामावून घेता येईल असे त्यांनी सांगितले.

कॉर्पोरेट जगत सामान्य माणसाला धडकी भरवते; मात्र गावातील सहकारी पतपेढी, सहकारी बँक सामान्य नागरिकांना आपली वाटते, असे सांगत मुख्यमंत्री श्री फडणवीस म्हणाले की, लोकाभिमुखता आणि वित्तीय प्रवेश ही सहकाराची ताकद आहे. जिल्हा सहकारी बँकांचे संचालक लोकशाही प्रक्रियेतून निवडले जात असल्याने त्यांची सामान्य शेतकऱ्याशी बांधिलकी राहते. व्यावसायिक आणि राष्ट्रीयीकृत बँकांनीही अशी बांधिलकी जपावी असे आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले.

विधानसभा अध्यक्ष ॲड राहूल नार्वेकर म्हणाले, सहकार आणि लोकशाही या एका नाण्याच्या दोन बाजू आहेत. संविधानात सहकार क्षेत्राचा विशेष उल्लेख लोकशाही बळकटीसाठी महत्त्वाचा आहे. विकास प्रक्रियेत प्रत्येक नागरिकाचा सहभाग सहकार चळवळीतूनच व्यापक पद्धतीने शक्य होतो, असे मत यावेळी त्यांनी व्यक्त केले.

सहकार विषयावर लिहिणाऱ्या लेखकांनाही यापुढे राज्य सरकारच्या वाङ्मय पुरस्कारांत समाविष्ट करण्यासंदर्भात प्रस्ताव असल्याचे उद्योग व मराठी भाषा मंत्री डॉ उदय सामंत यांनी सांगितले.

पुरस्कार विजेत्यांचे अभिनंदन करत सहकार क्षेत्रातील साहित्य निर्मिती आणि संस्थात्मक कामांना राज्य सरकारकडून आवश्यक ते सहकार्य दिले जाईल, असे डॉ सामंत यांनी सांगितले.

सहकार चळवळ राज्याच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहोचवण्याचे आवाहन सहकार व गृहनिर्माण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी पुरस्कार विजेत्यांना केले.

देशातील सहकार चळवळीत महाराष्ट्राचा सर्वाधिक वाटा असून सहकारातूनच समाजाची समृद्धी साध्य होऊ शकते, असे मंत्री डॉ. भोयर यांनी नमूद केले.

सहकार क्षेत्र मजबूत करण्यासाठी शिक्षण निधी तातडीने सुरू करून प्रलंबित धोरणांची अंमलबजावणी करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य सहकारी संघाचे अध्यक्ष आमदार प्रवीण दरेकर यांनी केली.

याचबरोबर विभागीय सहनिबंधक शहाजी पाटील, सहकार विभागाचे सहसचिव संतोष पाटील आणि जिल्हा उपनिबंधक राजेश लव्हेकर यांना 'सहकार प्रेरणा पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष सिद्धार्थ कांबळे, मुंबई हाऊसिंग फेडरेशनचे अध्यक्ष प्रकाश दरेकर आणि चारकोप अभिलाषा गृहनिर्माण सहकारी संस्थेचे श्रीकांत कवठणकर यांना 'सहकार नवोन्मेष पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

गडचिरोली जिल्हा आदिवासी बांबू प्रक्रिया सहकारी संस्थेचे आमदार नामदेव उसेंडी यांना 'सहकार ग्राम विकास पुरस्कार' देण्यात आला. सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मुख्याधिकारी राजेंद्र सरकले यांना 'सहकार बँकिंग उत्कृष्टता पुरस्कार' प्रदान करण्यात आला. अमरावती येथील शरदमाई विविध कार्यकारी संस्थेचे संजय सुणे नंदुरबार येथील प्रकाशा विविध कार्यकारी संस्थेचे दिलीप पाटील आणि यवतमाळ जिल्ह्यातील घाटंजी येथील श्रद्धेय आबासाहेब देशमुख पारवेकर विविध कार्यकारी संस्थेचे सचिन देशमुख पारवेकर यांना 'सहकार कृषी रत्न पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. तसेच छत्रपती संभाजीनगर जिल्हा दूध उत्पादक संघाचे अध्यक्ष विजय उत्तमराव काळे आणि लाडसावंगी विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे अध्यक्ष गोकुळ तोताराम राजपूत यांना 'दूध उत्पादक व सेवा सोसायटी पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

याशिवाय सेकंडरी स्कूल एम्पलॉइज को-ऑपरेटिव्ह सोसायटीचे अध्यक्ष चंद्रकांत पाटील यांना 'सहकार समाज सेवा पुरस्कार', महाराष्ट्र राज्य सहकारी संघाचे माजी अध्यक्ष अशोक जगताप यांना 'सहकार नेतृत्व पुरस्कार', ज्ञानदीप सहकारी पतसंस्थेचे व्ही. जी. पवार यांना 'आदर्श सहकारी संस्था पुरस्कार', गोराई सहकारी मच्छीमार संस्थेचे अध्यक्ष ऑल्विन वसईकर यांना 'सहकार उद्योग पुरस्कार', दि मुंबई अन्नधान्य दल फ ेडरेशनचे अध्यक्ष दशरथ घनवट यांना 'सहकार परिवर्तन पुरस्कार' आणि मार्केटिंग फेडरेशन, महाराष्ट्र राज्यचे अध्यक्ष रोहित निकम यांना 'युवा सहकार पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले.

### सहकार क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव

पुरस्कार वितरण सोहळ्यात विविध क्षेत्रांतील सहकार क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव करण्यात आला. महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे प्रशासकीय अध्यक्ष विद्याधर अनास्कर यांना 'सहकार महर्षी पुरस्कार', वारणा सहकार समूहाचे अध्यक्ष आमदार विनय कोरे यांना 'सहकार भूषण पुरस्कार', भगिनी निवेदिता सहकारी बँक, पुणेच्या अध्यक्षा डॉ. रेवती पैठणकर यांना 'सहकार रत्न पुरस्कार', महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष दिपक पटवर्धन यांना 'सहकार गौरव पुरस्कार', अण्णासाहेब सावंत नागरी सहकारी बँकेच्या अध्यक्षा श्रीमती शोभाताई सावंत यांना 'महिला सहकार शक्ती पुरस्कार' तसेच सहकार क्षेत्रातील ज्येष्ठ नेते शिवाजीराव नलावडे यांना 'सहकार विभूषण पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

## गुड न्यूज! आता महाराष्ट्र शासनाचे थेट अपडेट्स मिळणार 'व्हॉट्सप' चॅनल आणि 'पब्लिक ॲप' वर!

**मुंबई :** समाजमाध्यमांच्या विविध प्लॅटफॉर्म्सद्वारे नागरिकांपर्यंत अचूक, अधिकृत आणि वस्तुनिष्ठ माहिती पोहोचविणाऱ्या महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने आता 'व्हॉट्सप' चॅनल आणि 'पब्लिक' ॲप वर अधिकृत, प्रमाणित खाती सुरू केली आहेत.




आता नागरिक 'व्हॉट्सप' चॅनलवर DGIPR, Govt of Maharashtra या नावाने, तर पब्लिक पवर महाराष्ट्र शासन (mahadgipr) या नावाने शासकीय घडामोडींचे थेट अपडेट्स मिळवू शकतील. या दोन्ही प्लॅटफॉर्म्समुळे जनतेपर्यंत अधिक गतीने, अचूक, अधिकृत आणि वस्तुनिष्ठ माहिती थेट आणि व्यापक स्वरूपात पोहोचण्यास मोठी मदत होणार आहे.

शासन आणि जनतेला जोडणारा महत्त्वाचा दुवा आणि महाराष्ट्र शासनाच्या प्रसिद्धीच्या कामाचे संपूर्ण समन्वयन करणारी यंत्रणा म्हणून माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाची ओळख आहे. शासनाचे विविध लोकोपयोगी उपक्रम, योजना जनतेपर्यंत पोहोचविणे आणि त्याबाबतच्या जनतेच्या प्रतिक्रिया शासनापर्यंत पोहचविण्याची दुहेरी जबाबदारी महासंचालनालय पार पाडत असते. हे काम करताना डिजिटल क्रांतीचा पुढचा टप्पा म्हणून महासंचालनालयाने हायपरलोकल कंटेंट देणाऱ्या 'पब्लिक ॲप' वर आणि 'व्हॉट्सप चॅनल' वर आपली उपस्थिती नोंदवली आहे.

**महाराष्ट्र शासनाचे अधिकृत अपडेट्स हवे आहेत? मग खालील लिंक्सवर क्लिक करून आजच जॉईन व्हा :**

- व्हॉट्सप चॅनल: https://whatsapp.com/channel/0029VbBTiPx5Ui2ZR3iQwV3I
- पब्लिक ॲप: https://public.app/user/profile/aaSpb26TIpVKSSUlGc7wkCx-1to1
- महासंवाद: https://mahasamvad.in/
- एक्स (ट्विटर): https://twitter.com/MahaDGIPR
- फेसबुक: https://www.facebook.com/MahaDGIPR
- इन्स्टाग्राम: https://www.instagram.com/mahadgipr
- युट्यूब: https://www.youtube.com/M-H-R-SHTR-DGIPR
- टेलिग्राम: https://t.me/MahaDGIPR
- डेलिहंट: https://profile.dailyhunt.in/mahasamvad

अफवांवर विश्वास ठेवू नका! शासनाच्या अधिकृत आणि खात्रीशीर माहितीसाठी वरील चॅनेल्सना नक्की फॉलो करा

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## महत्त्वाचे...

### झेनिथ धबधब्यात अडकलेल्या पर्यटकांची ग्रामस्थांकडून थरारक सुटका





दैनिक आपला विदर्भ

**रायगड । प्रतिनिधी :** रायगड जिल्ह्यातील खोपोली येथील प्रसिद्ध झेनिथ धबधब्यात पाण्याचा प्रवाह वाढल्याने अडकलेल्या नागरिकांची विहारी ठाकूरवाडी येथील ग्रामस्थांनी धाडसाने सुटका केली. मुसळधार पावसामुळे धबधब्यावरील पाण्याचा वेग अचानक वाढल्याने काही नागरिक वाहत्या पाण्याच्या प्रवाहात अडकले होते. याची माहिती मिळताच स्थानिक ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेत दोरीच्या साहाय्याने जीवाची पर्वा न करता सर्वांना सुखरूप बाहेर काढले. ग्रामस्थांच्या प्रसंगावधानामुळे मोठी दुर्घटना टळली असून त्यांच्या धाडसाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### सराफा व्यापाऱ्याच्या लुटीचा उलगडा; चार आरोपी जेरबंद, सात लाख एकेचाळीस हजारांचा मुद्देमाल जप्त



दैनिक आपला विदर्भ

**नांदेड । प्रतिनिधी :** नांदेड जिल्ह्यातील लिंबगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सराफा व्यापाऱ्याच्या जबरी लुटीचा गुन्हा पोलिसांनी उघडकीस आणत तीन आरोपी आणि एका विधीसंघर्षग्रस्त बालकाला ताब्यात घेतले आहे. वसमत येथील सराफा व्यापाऱ्याला चाकूचा धाक दाखवून चांदीच्या दागिन्यांची बॅग लुटण्यात आली होती. लिंबगाव पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखेने या प्रकरणाचा छडा लावत चोरीस गेलेले चांदीचे दागिने, बॅग आणि गुन्ह्यात वापरलेली दुचाकी असा एकूण सात लाख एकेचाळीस हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. जुन्या वादातून हा गुन्हा घडवून आणल्याचे तपासात समोर आले असून मुख्य सूत्रधाराने सुपारी देऊन लुटीचा कट रचल्याचेही निष्पन्न झाले आहे. दरम्यान, पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांनी पाकिस्तानातील गुन्हेगारांकडून सामाजिक माध्यमांच्या माध्यमातून युवकांशी संपर्क साधला जात असल्याचा इशारा देत संशयास्पद संपर्क झाल्यास तात्काळ पोलिसांना माहिती देण्याचे आवाहन केले.

### मालेगावात घराचा स्लॅब कोसळून ७२ वर्षीय आजीसह २१ वर्षाच्या नातवाचा मृत्यू

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक । प्रतिनिधी :** जिल्ह्यात दोन दिवसांपासून पावसाची संततधार सुरू आहे. अशात मालेगाव शहरातील कलेक्टर पट्ट्यात राहत्या घराचा स्लॅब कोसळल्यानं ७२ वर्षाच्या आजीसह २१ वर्षाच्या नातवाच्या मृत्यू झाला आहे. या घटनेमुळं परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. मालेगाव येथील कलेक्टर पट्टा भागातील महात्मा फुले कॉलनीतील रामचंद्र येवले हे आई, कुटुंबासह राहत होते. शुक्रवारी सायंकाळी मुसळधार पावसामुळं त्यांच्या घराच्या हॉलचा भाग कोसळला. त्यात आई विमलबाई येवले आणि नातू चेतन येवले हे दोघेही त्याखाली दबले गेले. घटना घडल्यानंतर शेजारच्यांनी त्यांच्या घराकडं धाव घेतली. त्यांनी स्लॅबखाली दबलेल्या दोघांना बाहेर काढून उपचारासाठी सामान्य रुग्णालयात दाखल केलं. यावेळी रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना तपासून मृत घोषित केलं. या घटनेत प्रणिता येवले (वय २७) ही जखमी झाली आहे. याप्रकरणी छावणी पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे.

चणकापूर धरणातून पाण्याचा विसर्ग सुरू : कळवण तालुक्यात पावसाची संततधार सुरू आहे. अशात चणकापूर धरणाच्या पाणलोट क्षेत्रात जलस्तर वाढल्यामुळं तीन तारखेला (शुक्रवारी) रात्री उशिरा सांडवा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. पर्जन्यमान वाढल्यास विसर्ग वाढवण्याची शक्यता असल्यानं गिरणा काठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. मोठ्या प्रमाणात पाऊस पडत असल्यानं जलाशय भरून जात आहेत, त्याचवेळी धोकादायक इमारतीमध्ये राहणाऱ्यांची चिंताही वाढली आहे. जिल्ह्यात शुक्रवारी (दि. ४) सकाळपासून हलक्या पावसाच्या सरी कोसळत आहेत. हवामान विभागानं शनिवार (दि. ४) आणि रविवार (दि. ५) रोजी नाशिकच्या घाट परिसरात मुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त करत ऑरेंज अलर्ट जारी केला आहे.

# ई-स्पोर्ट्स वर्ल्ड कप २०२६ च्या माध्यमातून महाराष्ट्र डिजिटल क्रिएटिव्ह अर्थव्यवस्थेचे नेतृत्व करेल : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## इंडिया रायझिंग आणि जिओ ब्लास्टमुळे भारतीय युवा गेमर्ससाठी जागतिक व्यासपीठ खुले

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** पॅरिस येथे होणाऱ्या ई-स्पोर्ट्स वर्ल्ड कप २०२६ या गेमिंग विश्वाच्या ऑलिम्पिक स्पर्धेसाठी इंडिया रायझिंग आणि जिओ ब्लास्टच्या माध्यमातून भारताचे दरवाजे खुले होत आहेत. महाराष्ट्रातील आणि देशातील प्रत्येक गुणवंत युवा गेमरला आता जागतिक स्तरावर आपल्या कौशल्याचा ठसा उमटविण्याची संधी उपलब्ध झाली असून, हा भारताच्या डिजिटल क्रिएटिव्ह अर्थव्यवस्थेच्या वाटचालीतील ऐतिहासिक टप्पा असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

जिओ वर्ल्ड कन्व्हेंशन सेंटर, बीकेसी, मुंबई येथे आयोजित इंडिया रायझिंग : रोड टू ई-स्पोर्ट्स वर्ल्ड कप २०२६ या कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ पी अन्बळगन, जिओ ब्लास्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी चार्ली कॉड्रे, ईस्पोर्ट्स वर्ल्ड कप फाउंडेशनचे प्रतिनिधी जेम्स कनिंगहॅम, विविध ई-स्पोर्ट्स संघटनांचे प्रतिनिधी, उद्योग क्षेत्रातील मान्यवर तसेच देशभरातील गेमर्स मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मुंबईने चित्रपट आणि मनोरंजन उद्योगाच्या माध्यमातून स्वप्ननगरी म्हणून जागतिक ओळख निर्माण केली आहे. आता ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्ट्स, गेमिंग, कॉमिक्स आणि एक्सटेंडेड रिॲलिटी (एव्हीजीसी-एक्सआर) या नव्या सर्जनशील उद्योगांमध्येही महाराष्ट्र देशाचे नेतृत्व करण्यासाठी सज्ज झाला आहे. माहिती तंत्रज्ञान, डिजिटल कौशल्य, उत्कृष्ट शैक्षणिक संस्था, चित्रपटसृष्टी, ओटीटी निर्मिती, पोस्ट-प्रोडक्शन सुविधा आणि सक्षम पायाभूत व्यवस्था यांमुळे






महाराष्ट्राने या क्षेत्रात भक्कम परिसंस्था उभी केली आहे.

**एव्हीजीसी-एक्सआर क्षेत्र झपाट्याने विकसित**

गेमिंग उद्योगाच्या वाढत्या सामर्थ्याकडे लक्ष वेधताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, जागतिक स्तरावर गेमिंग उद्योगाचा वार्षिक महसूल चित्रपट आणि संगीत उद्योगाच्या एकत्रित महसुलापेक्षाही अधिक झाला आहे. भारतात ५० कोटींहून अधिक सक्रिय गेमर्स असून देशांतर्गत गेमिंग उद्योगाची व्याप्ती सुमारे ४० हजार कोटी रुपयांपर्यंत पोहोचली आहे. त्यामुळे गेमिंग हा केवळ मनोरंजनाचा विषय नसून रोजगार, नवोन्मेष, उद्योजकता आणि डिजिटल अर्थव्यवस्थेचा प्रभावी आधारस्तंभ बनत आहे. परवडणारा डेटा, वेगवान इंटरनेट, युपीआय व्यवहार व्यवस्था आणि अत्याधुनिक डिजिटल तंत्रज्ञानामुळे भारतात एव्हीजीसी-एक्सआर क्षेत्र झपाट्याने विकसित होत आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, व्हर्च्युअल प्रोडक्शन आणि इमर्सिव्ह तंत्रज्ञानाच्या साहाय्याने भविष्यातील मनोरंजन आणि डिजिटल कंटेंट उद्योगाची दिशा निश्चित होत आहे.

मुंबई, नवी मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर येथे अत्याधुनिक व्हर्च्युअल प्रोडक्शन व कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित रेंडरिंग सुविधा उभारण्यात येणार असून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरात ५० एकर क्षेत्रावर जागतिक दर्जाचे कंटेंट क्रिएटर्स संकुल उभारण्यात येणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या पुढाकारातून मुंबईमध्ये इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजीज स्थापन होत असल्याचा उल्लेख करून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, ही संस्था देशाच्या क्रिएटिव्ह आणि ऑरेंज इकॉनॉमीला नवी दिशा देणारी ठरेल आणि जागतिक दर्जाचे मनुष्यबळ घडविण्यात महत्त्वाची भूमिका बजावेल.

ई-स्पोर्ट्स वर्ल्ड कप २०२६ संदर्भात मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, इंडिया रायझिंग आणि जिओ ब्लास्ट या उपक्रमांमुळे भारतातील प्रत्येक युवा गेमरला जागतिक स्पर्धेत सहभागी होण्याचा मार्ग उपलब्ध झाला आहे. महाराष्ट्रातील शहरांसह ग्रामीण भागातील प्रतिभावान युवकांनाही आता जागतिक स्तरावर पोहोचण्याची समान संधी मिळणार आहे. त्यामुळे भारताची गेमिंग प्रतिभा जागतिक मंचावर अधिक प्रभावीपणे झळकणार आहे.

या उपक्रमात सुमारे ५० हजार स्पर्धक, पाच हजार प्रत्यक्ष प्रेक्षक, आठ कोटी डिजिटल प्रेक्षक आणि २० कोटींहून अधिक डिजिटल इम्प्रेशन्स अपेक्षित असून जिओच्या ६० कोटींहून अधिक वापरकर्त्यांपर्यंत या अभियानाची पोहोच होणार असल्याचे त्यांनी सांगितले. भारताच्या इतिहासातील सर्वात व्यापक आणि प्रभावी ई-स्पोर्ट्स अभियान म्हणून इंडिया रायझिंगची नोंद होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

गेमिंग उद्योग भविष्यातील जागतिक अर्थव्यवस्थेचा महत्त्वपूर्ण घटक ठरणार असून महाराष्ट्रातील युवा शक्ती, नवोन्मेष आणि सर्जनशीलतेच्या बळावर राज्य जागतिक गेमिंग आणि डिजिटल कंटेंट उद्योगाचे नेतृत्व करेल, असा विश्वास व्यक्त करत मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, "चित्रपट आपल्याला स्वप्नांचे जग दाखवतात; परंतु गेमिंग आपल्याला त्या स्वप्नांचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची आणि स्वतः त्या विश्वाचा नायक बनण्याची संधी उपलब्ध करून देते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल आयोजक, जिओ ब्लास्ट, उद्योग क्षेत्रातील सहभागी संस्था तसेच सर्व स्पर्धकांचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी अभिनंदन केले. महाराष्ट्र शासन एव्हीजीसी-एक्सआर, गेमिंग आणि ई-स्पोर्ट्स क्षेत्राला सर्वतोपरी पाठबळ देत राज्याला डिजिटल क्रिएटिव्ह अर्थव्यवस्थेचे जागतिक केंद्र बनविण्यास कटिबद्ध असल्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

### राज्यभरात १२ एव्हीजीसी पार्क

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, व्यापक एव्हीजीसी-एक्सआर धोरण जाहीर करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. या धोरणांतर्गत ३,२६८ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून ५० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आकर्षित करणे आणि दोन लाख रोजगारनिर्मितीचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. या क्षेत्राला उद्योग आणि पायाभूत सुविधा क्षेत्राचा दर्जा देण्यात आला असून राज्यभरात १२ एव्हीजीसी पार्क विकसित करण्यात येत आहेत.

# उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी घेतले श्री विठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन



दैनिक आपला विदर्भ

**पंढरपूर । प्रतिनिधी :** उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी आज श्री विठ्ठल आणि रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले.

यावेळी मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या हस्ते उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचा शाल व श्री विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी आमदार दिलीप वळसे पाटील, नगराध्यक्ष प्रणिती भालके, मंदिर समितीचे सदस्य शकुंतला नडगिरे, ज्ञानेश्वर महाराज जळगावकर, संभाजी शिंदे, जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, जिल्हा पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी आदी उपस्थित होते.

तत्पूर्वी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर संवर्धन विकास आराखड्याअंतर्गत सुरू असलेल्या कामांची पाहणी करुन माहिती घेतली. यावेळी मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी मंदिर जतन व संवर्धन विकास आराखड्याअंतर्गत करण्यात आलेल्या व करण्यात येणाऱ्या कामांची माहिती दिली.

# राजर्षी शाहू महाराज जेष्ठ साहित्यिक व कलाकार सन्मान योजनेसाठी अर्ज सादर करण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** राजर्षी शाहू महाराज जेष्ठ साहित्यिक व कलाकार सन्मान योजनेंतर्गत कला व साहित्य क्षेत्रातील योगदान असणाऱ्या १०० ज्येष्ठ साहित्यिक व कलाकारांना प्रति महिना रू. ५०००/- (अक्षरी पाच हजार रुपये फक्त) मानधन देण्यात येते. यासाठी पात्र लाभार्थींना १ ते ३१ जुलैपर्यंत ऑनलाईन आपले सरकार पोर्टलवर अर्ज करण्याचे आवाहन मुंबई शहरच्या निवासी उपजिल्हाधिकारी यांनी केले आहे.

या योजनेसाठी लाभार्थींची पात्रता पुढीलप्रमाणे आहे. लाभार्थीचे वय ५० वर्षापेक्षा जास्त असावे. दिव्यांगाना वयाची अट १० वर्षाने शिथिल करण्यात आली आहे. त्यांची वयोमर्यादा ४० वर्षे आहे. कला व साहित्य क्षेत्रात योगदान कमीत कमी १५ वर्षे असावे. वयाने ज्येष्ठ असणारे विधवा, परित्यक्त्या, दिव्यांग कलाकारांना प्राधान्य राहील. कलाकारांचे वार्षिक उत्पन्न ६० हजारापेक्षा जास्त नसावे. ज्या कलाकारांची उपजिवीका फक्त कलेवरच अवलंबून आहे. त्यांना कोणत्याही मार्गाने उत्पन्न नाही असे कलाकार पात्र राहतील. ते केंद्र व राज्य शासनाच्या महामंडळ व कोणत्याही नियमित मासिक पेन्शन योजनेत अंतर्गत नसावे. कलाकार महाराष्ट्राचा रहिवासी असणे बंधनकारक आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी ज्येष्ठ साहित्यिक व कलाकारांनी मुदतीत आपले सरकार पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करावा. असे आवाहन, निवासी उपजिल्हाधिकारी, मुंबई शहर डॉ. शिवनंदा लंगडापुरे यांनी केले आहे.

अर्जासोबत आवश्यक असणारी कागदपत्रे वयाचा दाखला, आधार कार्ड, उत्पन्नाचा दाखला, रहिवासी दाखला, प्रतिज्ञापत्र, पति-पत्नी एकत्रित फोटो (लागू असल्यास), बँक पासबूक, अपंगत्व दाखला (लागू असल्यास) राज्य व केंद्र सरकारचे प्रमाणपत्र (लागू असल्यास), नामांकित संस्था, व्यक्ती यांचे शिफारसपत्र (लागू असल्यास) यासह विविध पुरावे, आदी कागदपत्रे असणे आवश्यक आहे.

## एकनाथ शिंदेंची प्रकृती कशी? ताप अन् अशक्तपणा असल्याने रुग्णालयात दाखल

**मुंबई । प्रतिनिधी :** राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या तब्येतीबद्दल महत्त्वाची अपडेट समोर आली आहे. एकनाथ शिंदे यांना शुक्रवारी अशक्तपणामुळे रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. आता त्यांची तब्येत स्थिर असून संध्याकाळपर्यंत त्यांना डिस्चार्ज देण्यात येणार असल्याची माहिती आहे. सततची दगदग, धावपळ यामुळे एकनाथ शिंदे यांना अशक्तपणा आला होता आणि त्यांची तब्येत बिघडल्याचं सांगण्यात येत आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना शुक्रवारी रात्री आठ वाजल्यापासून जुपिटर रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. एकनाथ शिंदे यांना ताप आणि अशक्तपणा जाणवत असल्याने ठाण्याच्या जुपिटर रुग्णालयात शुक्रवारी दाखल करण्यात आल्याची माहिती आहे.

# १७ वर्षीय हितेनने रचला जागतिक इतिहास: सर्वात लहान रोबोटिक आर्मने मोडला गिनीज विक्रम

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर । प्रतिनिधी :** महाराष्ट्रातील स्कूल ऑफ स्कॉलर्स शाळेचा १७ वर्षीय विद्यार्थी हितेन धारपुरे याने अभूतपूर्व यश संपादन केलेय. त्याने जगातील सर्वात लहान पूर्णपणे कार्यक्षम रोबोटिक आर्म विकसित करून गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड आपल्या नावे केला आहे. केवळ ३९.२५० मिलिमीटर आकाराच्या या रोबोटिक आर्मने अमेरिकेतील पूर्वीचा ४४.४९ मिलिमीटरचा विक्रम मोठ्या फरकाने मोडला आहे. या यशाने केवळ नागपूर आणि महाराष्ट्रच नव्हे तर संपूर्ण भारताचा जागतिक स्तरावर गौरव झाला आहे. मर्यादित संसाधन, नावीन्यपूर्ण कल्पना आणि दृढ निश्चयाने मोठे यश मिळवता येते, असे हितेनच्या या प्रकल्पाने दाखवून दिले आहे. या रोबोटिक आर्मची



निर्मिती केवळ दोन महिन्यांत पूर्ण झाली. ही कामगिरी युवा भारतीयांच्या वैज्ञानिक क्षमतेचे उत्तम उदाहरण आहे.

यापूर्वी हा विक्रम अमेरिकेतील इंडियाना येथील केल्टन सेरा यांच्या नावे



होता. त्यांनी तयार केलेल्या ४४.४९ मिलिमीटर आकाराच्या ३डी-प्रिंटेड रोबोटिक आर्मला गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड मिळाला होता. हितेननं मात्र केवळ ३९.२५० मिलिमीटर आकारात अत्यंत अचूक आणि कार्यक्षम रोबोटिक आर्म तयार करून हा विक्रम खूप मोठ्या फरकानं मोडला. हा रोबोटिक आर्म पूर्णपणे इलेक्ट्रोमेकॅनिकल आहे. तो मानवी हाताप्रमाणे विविध गुंतागुंतीची कार्ये करू शकतो. त्यात मायक्रो सर्वो मोटर्स आणि उच्च अचूकतेचं पीडब्ल्यूएम कंट्रोल मॉड्यूल वापरण्यात आलं आहेत. हा आर्म तीन स्वतंत्र अक्षांवर हालचाल करू शकतो आणि अतिशय लहान वस्तूही अचूकपणे पकडण्याची क्षमता त्याच्यात आहे.

हितेनने या प्रकल्पासाठी सहज उपलब्ध तंत्रज्ञानाचा वापर केला. एफडीएम ३डी प्रिंटिंग तंत्रज्ञानाद्वारे त्याने स्वत: कस्टम चेसिसची रचना तयार केली. संपूर्ण मॉडेलची रचना अत्याधुनिक CAD (Computer Aided Design) सॉफ्टवेअरच्या साहाय्यानं सुरुवातीपासून तयार करण्यात आली. सर्वात मोठे आव्हान होतं ते म्हणजे अत्यंत छोट्या जागेत सर्वो मोटर्स, वायरिंग आणि इतर घटकांची अचूक मांडणी करणे. मायक्रो-मॅन्युफॅक्चरिंगच्या भौतिक मर्यादा ओलांडून उच्च अचूकता साधणे हे हितेनसमोरचं मुख्य आव्हान होतं. मात्र, त्यानं अपार मेहनत आणि सर्जनशीलतेनं ते यशस्वीरित्या पूर्ण केलं.

हितेनचं हे यश STEM (Science, Technology, Engineering and Mathematics) क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मोठी प्रेरणा आहे. मर्यादित जागेत आणि उपलब्ध साधनांसह उच्च दर्जाचे रोबोटिक्स विकसित करता येते, हे या प्रकल्पानं सिद्ध केलं आहे. पुस्तकी ज्ञानापलीकडे जाऊन प्रात्यक्षिक आणि नवोन्मेष करणे किती महत्त्वाचे आहे, हे यावरून दिसून येतं. दृढ निश्चय, नावीन्यपूर्ण विचार आणि तांत्रिक कौशल्य यांच्या बळावर जगात आपली ओळख निर्माण करता येते, हा संदेश हितेनच्या यशातून मिळतो. सध्या हितेनच्या या ऐतिहासिक कामगिरीचं विविध स्तरांतून कौतुक होत आहे. महाराष्ट्र सरकार, शिक्षण संस्था आणि विज्ञान प्रेमींकडून त्याला शुभेच्छा मिळत आहेत. हितेनचे हे यश केवळ वैयक्तिक नाही तर संपूर्ण युवा पिढीला प्रोत्साहन देणारे आहे.

वृत्तविशेष...

## वसई विरारमध्ये पाणी साचल्यामुळे चाकरमान्यांचे हाल! ट्रॅक्टरमधून प्रवास करण्याची वेळ

दैनिक आपला विदर्भ

**वसई । प्रतिनिधी :** वसई विरार शहरात शनिवार सकाळपासूनच मुसळधार पावसाने हजेरी लावली आहे. तर मुसळधार पावसामुळे शहरातील रस्ते पाण्याखाली गेले असून वाहतूक सेवा कोलमडल्यामुळे नागरिकांना चक्क ट्रॅक्टरमधून प्रवास करावा लागत आहे. पालघर जिल्ह्यात आज हवामान विभागाने मुसळधार ते अतीमुसळधार पाऊस कोसळण्याची शक्यता वर्तवली होती. त्यानुसार सकाळपासूनच मेघगर्जनांसह पाऊस कोसळायला सुरुवात झाली आहे. मुसळधार पावसामुळे तसेच पावसाच्या पाण्याचा निचरा होण्यासाठी पुरेसे मार्ग नसल्याने वसईतील आक्टन, गिरीज, बंगली, दीनदयाल नगर, रेंज ऑफिस, तुंगारेश्वर, सातिवली, मधुबन, विरारमधील राजोडी, उंबरगोठण, कुंभारपाडा, विराटनगर, ग्लोबल सिटी, नालासोपाऱ्यातील गास, येथील कोळीवाडा, सनटेक आणि रेल्वे स्थानक परिसरात मोठ्या प्रमाणावर पाणी साचले आहे.

गुडघाभर साचलेल्या पाण्यातून दुचाकीचालकच नव्हे तर चारचाकी चालक, रिक्षा आणि अगदी परिवहनच्या बस चालकांना देखील मार्ग काढणे कठीण होऊन बसले आहे. त्यामुळे लांब पल्ल्याचा प्रवास करणारे, गावपाड्यातून तसेच शहराच्या अंतर्गत भागातून प्रवास करणाऱ्या चाकरमान्यांचे यामुळे हाल होत आहेत. ठाणे, पालघर जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे शाळा महाविद्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात आली असली तरी चाकरमान्यांना मात्र कार्यालय गाठावे लागत आहे. त्यामुळे आता कामावर जाणारे आणि कामावरून परतणाऱ्या नागरिकांना ट्रॅक्टरमधून प्रवास करावा लागत आहे.

गेल्यावर्षी सुद्धा ऑगस्ट महिन्यात पडलेल्या पावसामुळे परिवहन सेवेवर अशाच पद्धतीने परिणाम झाला होता. त्यामुळे नागरिकांना ट्रॅक्टरमधून प्रवास करावा लागला होता.

## प्रसिद्ध सोशल मीडिया इन्फ्ल्युएंसरला दिवसाढवळ्या संपवले; नवऱ्याने बायकोवर केले सपासप वार अन् स्वत:लाही...

दैनिक आपला विदर्भ

**मेरठ :** सोशल मीडियाला हादरवणारी घटना समोर आली आहे. उत्तरप्रदेशच्या मेरठमध्ये इन्फ्ल्युएंसर निशा चौहान हिची हत्या करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवारी सकाळी ६ वाजण्याच्या सुमारास निशाचा पती प्रदीप चौहानने चाकूने वार करुन तिची हत्या केली. वयाच्या ४० व्या वर्षी तिचे निधन झाले असल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेनंतर निशाचा पती प्रदीप चौहानने स्वत:वर चाकूने वार करुन घेतले असल्याची माहिती आहे. ज्यामुळे तो गंभीर जखमी झाला आहे.

या भांडणात मध्यस्थी करण्यासाठी आलेला त्यांचा मुलगाही या हल्ल्यात गंभीररित्या जखमी झाला आहे. आरडाओरड झाल्यानंतर शेजाऱ्यांनी तातडीने निशाच्या घरी धाव घेतली. त्यावेळेस शेजाऱ्यांनी निशाला रक्ताच्या थारोळ्यात जमिनीवर पडली असल्याचं पाहिलं. प्रदीप चौहानही यावेळेस गंभीर जखमी अवस्थेत आढळला. याची माहिती तातडीने पोलिसांना देण्यात आली. पोलिसांनी दोघांनाही तातडीने रुग्णालयात नेले. दरम्यान, डॉक्टरांनी तपासून निशाला मृत घोषित केले.

## रत्नागिरीत पावसाचा रौद्रावतार; जगबुडी धोक्याच्या पातळीवर

**रत्नागिरी । प्रतिनिधी :** कोकणावर पावसाचे संकट अधिकच गडद होत असून रत्नागिरी जिल्ह्यात निसर्गाने अक्षरश: रौद्ररूप धारण केले आहे. अविरत कोसळणाऱ्या मुसळधार पावसामुळे नद्या दुथडी भरून वाहू लागल्या आहेत, तर अनेक भागांमध्ये पूर, भूस्खलन आणि जलमय परिस्थिती निर्माण झाली आहे. जनजीवन विस्कळीत झाले असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. हवामान विभागाने शनिवार आणि रविवारसाठी अतिमुसळधार पावसाचा रेड अलर्ट जारी केल्याने जिल्हा प्रशासनाने संपूर्ण आपत्कालीन यंत्रणा सज्ज ठेवली आहे.खेड तालुक्यातील जगबुडी नदीने इशारा पातळी ओलांडत धोक्याची घंटा वाजवली आहे. शहरातील मटण मार्केट परिसरात पुराचे पाणी शिरू लागल्याने व्यापारी आणि नागरिकांनी धास्ती घेतली आहे. चिपळूण, संगमेश्वर आणि राजापूरमध्येही पूरस्थिती निर्माण होण्याची शक्यता बळावली असून नदीकाठच्या गावांमध्ये सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. संभाव्य आपत्तीचा सामना करण्यासाठी प्रशासनाने बचाव पथके, बोटी आणि आवश्यक साहित्य सज्ज ठेवले आहे. एनडीआरएफचे तीन अधिकारी, २३ जवान आणि तीन चालकांचे पथक शुक्रवारी रात्री चिपळूणमध्ये दाखल झाले असून त्यांनी संभाव्य पूरग्रस्त भागांची पाहणी सुरू केली आहे.दरम्यान, रत्नागिरी–कोल्हापूर महामार्गावरील आंबा घाटात शनिवारी मोठी दुर्घटना थोडक्यात टळली. गणेश मंदिर परिसरात अचानक प्रचंड आकाराचा दगड रस्त्यावर कोसळला. मात्र, कर्तव्यदक्ष पोलीस कर्मचारी आणि सांगलीहून आलेल्या काही युवकांनी प्रसंगावधान राखत तातडीने दगड हटवून वाहतूक सुरळीत केली.

# मयतांच्या नावावर रेशनची लूट? मेहकर प्रशासन झोपेत

## ११ दिवस उलटले तरी चौकशीच नाही!

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर । प्रतिनिधी :** मेहकर तालुक्यातील सार्वजनिक वितरण प्रणालीतील (रेशन) कथित मोठ्या घोटाळ्याप्रकरणी महसूल प्रशासनाच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. मयत व्यक्तींच्या नावावर आजही रेशन धान्य उचलले जात असल्याचा गंभीर आरोप करत राष्ट्रवादी कॉँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे युवा नेते तथा जिल्हाध्यक्ष गोपाल सुभाषराव आखाडे यांनी २२ जून रोजी तहसीलदारांकडे लेखी तक्रार दाखल केली होती. मात्र इतके दिवस उलटूनही या प्रकरणात साधी प्राथमिक चौकशीही सुरू झालेली नसल्याची माहिती समोर आली आहे.





तक्रारीनुसार, मेहकर तालुक्यातील अनेक गावांमध्ये वर्षानुवर्षांपूर्वी मृत्यू झालेल्या व्यक्तींची नावे अद्याप रेशन कार्डवर कायम असून त्यांच्या नावावर नियमित धान्य उचलले जात असल्याची चर्चा आहे. हे आरोप खरे ठरल्यास शासनाच्या धान्याचा मोठ्या प्रमाणावर अपहार झाल्याचे स्पष्ट होऊ शकते. तसेच संबंधित रेशन दुकानदार, पुरवठा विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या संगनमताची शक्यताही व्यक्त करण्यात आली आहे.

या प्रकरणाची सखोल चौकशी करून मृत व्यक्तींची नावे तात्काळ रेशन कार्डमधून वगळावीत, त्यांच्या नावावर धान्य उचलल्याची स्वतंत्र चौकशी करावी आणि दोषींवर फौजदारी स्वरूपाची कठोर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

याशिवाय, अनेक कुटुंबांमध्ये नवविवाहित महिला आणि नवजात बालकांची नावे वेळेत रेशन कार्डमध्ये समाविष्ट होत नसल्याने सर्वसामान्य नागरिकांना त्रास सहन करावा लागत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे नाव समाविष्ट करण्याची प्रक्रिया सुलभ व ऑनलाइन करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

मात्र सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, २२ जून रोजी तक्रार करूनही प्रशासनाने अद्याप कोणतीही ठोस हालचाल केलेली नाही. त्यामुळे महसूल प्रशासन नेमके कोणाची वाट पाहत आहे? चौकशी सुरू होणार कधी? दोषींवर कारवाई होणार की प्रकरण दडपण्याचा प्रयत्न केला जाणार? असे संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केले जात आहेत.

आता या गंभीर आरोपांची चौकशी कधी सुरू होते आणि महसूल प्रशासन याप्रकरणी कोणती भूमिका घेते, याकडे संपूर्ण मेहकर तालुक्याचे लक्ष लागले आहे.

"दैनिक आपला विदर्भशी बोलताना तक्रारकर्ते तथा राष्ट्रवादी कॉँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे युवा जिल्हाध्यक्ष गोपाल आखाडे यांनी प्रशासनाला थेट इशारा दिला. ते म्हणाले, २२ जून रोजी लेखी तक्रार देऊनही महसूल प्रशासनाने कोणतीही ठोस कारवाई केलेली नाही. या गंभीर प्रकरणाची तातडीने चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई झाली नाही, तर येत्या काही दिवसांत तीव्र व उग्र स्वरूपाचे जनआंदोलन छेडण्यात येईल. या आंदोलनाला पूर्णपणे महसूल प्रशासनच जबाबदार असेल.'' या इशाऱ्यामुळे मेहकर तालुक्यातील रेशन घोटाळ्याचा मुद्दा आणखी तापण्याची चिन्हे असून, प्रशासन आता तरी जागे होणार का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.


## आमिर खान–गौरी स्प्रॅटचा खासगी विवाह सोहळा

**मुंबई । प्रतिनिधी :** बॉलिवूडचा 'मिस्टर परफेक्शनिस्ट' आमिर खान ५ जुलै रोजी गर्लफ्रेंड गौरी स्प्रॅटसोबत विवाहबंधनात अडकणार आहे. गेल्या काही दिवसांपासून या लग्नाबाबत अनेक चर्चा सुरू होत्या. अखेर आमिरने स्वत:च लग्नाची पुष्टी करत हा सोहळा अत्यंत खासगी स्वरूपात होणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

'प्रीतम अँड पेड्रो' या चित्रपटाच्या स्क्रीनिंगदरम्यान आमिर खान म्हणाला, ''होय, मी ५ जुलै रोजी लग्न करत आहे. हा अत्यंत खासगी विवाहसोहळा असून आम्ही तो घरीच आयोजित केला आहे. या सोहळ्याला दोन्ही कुटुंबातील सदस्य आणि काही जवळचे मित्रच उपस्थित राहतील. आम्हाला सर्वांचे आशीर्वाद हवेत.''

मिळालेल्या माहितीनुसार, आमिर आणि गौरी यांनी लग्नासाठी केवळ १०० ते १५० पाहुण्यांनाच निमंत्रण दिले आहे. यात दोन्ही कुटुंबातील सदस्य, जवळचे मित्र आणि बॉलिवूडमधील काही निवडक कलाकारांचा समावेश आहे.

## अयोध्या राम मंदिराचा कारभार शेगाव संस्थान किंवा भारतीय लष्कराकडे द्या; सुबोध सावजींची राष्ट्रपतींकडे मागणी



दैनिक आपला विदर्भ

**मेहकर । प्रतिनिधी :** अयोध्या येथील श्रीराम मंदिर संस्थानाचा कारभार पारदर्शक व शिस्तबद्ध पद्धतीने चालावा, यासाठी तो शेगाव येथील श्री गजानन महाराज संस्थान किंवा भारतीय लष्कराकडे सोपविण्यात यावा, अशी मागणी बुलढाणा–अकोल्याचे माजी पालकमंत्री तथा माजी राज्यमंत्री सुबोध सावजी यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना पत्राद्वारे केली आहे.

अयोध्या राम मंदिर संस्थानात झालेल्या कथित चोरी व भ्रष्टाचाराच्या घटनांमुळे देशाची आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रतिमा मलिन होत असल्याचा दावा सावजी यांनी पत्रात केला आहे. या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे. तसेच, मंदिरातील कथित गैरव्यवहारासाठी जबाबदार असलेल्या दोषींना कठोर शिक्षा व्हावी, अशी भूमिका त्यांनी मांडली आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या शेगाव दौऱ्याचा उल्लेख करत सावजी यांनी पत्रात म्हटले आहे की, श्री गजानन महाराज संस्थानचा पारदर्शक, शिस्तबद्ध आणि आदर्श कारभार आपण स्वतः अनुभवला असून त्याबाबत गौरवोद्गारही काढले होते. त्यामुळे अशाच पारदर्शक व्यवस्थापनाचा आदर्श अयोध्या राम मंदिरासाठीही स्वीकारावा, अशी त्यांची भूमिका आहे.

भारतीय लष्कराची प्रामाणिकता, शिस्त आणि कार्यक्षमतेचा उल्लेख करत, अयोध्या राम मंदिराच्या व्यवस्थापनाची जबाबदारी शेगाव संस्थान किंवा भारतीय लष्कर यापैकी कोणत्याही सक्षम यंत्रणेकडे सोपविण्याची मागणी त्यांनी राष्ट्रपतींकडे केली आहे.

## बुलढाणा जिल्ह्यात पुढील चार दिवस पावसाचा जोर कायम; मेघगर्जना, विजांचा कडकडाट आणि वादळी वाऱ्याचा इशारा

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा । प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यात पुढील चार दिवस पावसाचे सक्रिय वातावरण कायम राहण्याचा अंदाज भारतीय हवामान विभागाने व्यक्त केला आहे. ४ ते ७ जुलै या कालावधीत जिल्ह्यात सर्वत्र ढगाळ वातावरण राहण्याची शक्यता असून, मध्यम ते मुसळधार पाऊस, मेघगर्जना, विजांचा कडकडाट आणि ताशी ४० ते ५० किलोमीटर वेगाने वादळी वारे वाहण्याचा इशारा देण्यात आला आहे.



हवामान विभागाच्या अंदाजानुसार, ४ आणि ५ जुलै रोजी बुलढाणा जिल्ह्यात मध्यम ते मुसळधार पावसाची शक्यता आहे. या कालावधीत एक–दोन ठिकाणी जोरदार पावसाच्या सरी कोसळू शकतात. विजांच्या कडकडाटासह मेघगर्जना आणि सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी तसेच शेतकऱ्यांनी विशेष दक्षता घ्यावी.

६ आणि ७ जुलै रोजी पावसाचा जोर काहीसा कमी होण्याची शक्यता असली तरी जिल्ह्यात हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस सुरू राहील. या काळातही काही ठिकाणी मेघगर्जना, विजांचा कडकडाट आणि ताशी ४० ते ५० किलोमीटर वेगाने वारे वाहू शकतात.

सततच्या पावसामुळे नदी–नाले, ओढे आणि सखल भागातील पाण्याची पातळी वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी अनावश्यकपणे पूरग्रस्त किंवा पाण्याखालील मार्गांचा वापर टाळावा. विजांचा कडकडाट सुरू असताना झाडाखाली किंवा मोकळ्या मैदानात थांबू नये. शेतकऱ्यांनी हवामानाचा अंदाज लक्षात घेऊन शेतीची कामे नियोजनपूर्वक करावीत, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

दरम्यान, अमरावती विभागातील अमरावती, अकोला, वाशीम आणि यवतमाळ जिल्ह्यांमध्येही पुढील चार दिवस मेघगर्जनेसह पाऊस आणि वादळी वाऱ्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. काही ठिकाणी मुसळधार पावसाचाही अंदाज असल्याने संपूर्ण विभागात पावसाचे सक्रिय वातावरण कायम राहण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे.

# वर्षानुवर्षे पडून असलेला लाखोंचा गुटखा अखेर नष्ट!

## चिखली पोलिसांची धडक कारवाई; अवैध व्यावसायिकांचे धाबे दणाणले







दैनिक आपला विदर्भ

**चिखली । प्रतिनिधी :** चिखली पोलिसांनी अवैध गुटखा व्यवसायाविरोधातील आपल्या कठोर भूमिकेचा पुन्हा एकदा प्रत्यय देत, अनेक वर्षांपासून जप्त करून ठेवलेल्या लाखो रुपयांच्या गुटख्याची अखेर कायदेशीर प्रक्रियेनंतर विल्हेवाट लावली. ठाणेदार भूषण गावंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि मार्गदर्शनाखाली ही कारवाई पार पडली.

चिखली शहर व परिसरात बेकायदेशीररीत्या गुटखा विक्री करणाऱ्यांविरोधात पोलिसांनी वेळोवेळी धाडी टाकून मोठ्या प्रमाणात गुटखा जप्त केला होता. न्यायालयीन व प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर हा संपूर्ण मुद्देमाल नियमानुसार नष्ट करण्यात आला.

या कारवाईदरम्यान ठाणेदार भूषण गावंडे यांनी स्वतः उपस्थित राहून संपूर्ण प्रक्रियेवर देखरेख ठेवली. सर्व नियमांचे पालन करत जप्त गुटख्याची सुरक्षितपणे विल्हेवाट लावण्यात आली.

या धडक कारवाईमुळे अवैध गुटखा व्यवसाय करणाऱ्यांना स्पष्ट इशारा मिळाला असून, बेकायदेशीर धंद्यांविरोधात पोलिस प्रशासन कोणतीही तडजोड करणार नसल्याचा ठोस संदेश देण्यात आला आहे.